



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे






वर्ष ५ । अंक १७८ । गुरुवार २ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## अपघाताच्या कारणातून व्यापाऱ्यावर जमावाचा हल्ला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रिक्षा व मोपेड दुचाकी यांच्या किरकोळ अपघातानंतर कापडबाजारातील व्यापारी दीपक नवलानी यांच्यावर लालटाकी परिसरात जमावाने प्राणघातक हल्ला केल्याची घटना काल (बुधवारी) दुपारी साडेचारच्या सुमारास घडली. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

रिक्षा चालकाने अचानक यू-टर्न घेतल्यामुळे झालेला किरकोळ अपघात हे या वादाचे कारण ठरले. त्यानंतर जमावाने व्यापारी दीपक नवलानी यांच्यावर हल्ला चढवत त्यांना बेदम मारहाण केली. या प्रकरणी जखमी नवलानी यांच्या पत्नी कनक नवलानी यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गैरवर्तनाचा जाब विचारताच अप्पू हत्ती चौकात घडली घटना

फिर्यादी कनक नवलानी या आपल्या मुलासमवेत मोपेड दुचाकीवर दातांच्या उपचारासाठी रुग्णालयात जात असताना अप्पू हत्ती चौकात पुढे असलेल्या रिक्षाने अचानक यू-टर्न घेतल्याने त्यांची मोपेड रिक्षावर आदळली. या घटनेचा जाब विचारल्यावर रिक्षाचालकाने उद्धटपणे हमरीतुमरी सुरू केली. त्याचवेळी दुचाकीवरील एका तरुणानेही येऊन फिर्यादीशी गैरवर्तन केले. याची माहिती मिळताच व्यापारी दीपक नवलानी तातडीने घटनास्थळी आले. संबंधितांना याचा जाब विचारला असता सुरुवातीला किरकोळ बाचाबाची होऊन काही वेळातच परिसरात मोठा जमाव जमा झाला आणि त्यातील काही युवकांनी नवलानी यांच्यावर अचानक हल्ला चढवला. या मारहाणीत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन पाच टाके पडले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच या गोंधळात त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी व इतर दागिनेही गहाळ झाल्याची नोंद फिर्यादीत करण्यात आली आहे.

### पोलिसांनी जमाव पांगवला, तीन वर्षांपूर्वीच्या घटनेचा संदर्भ

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जमाव पांगवला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, तीन वर्षांपूर्वी कापड बाजारात दुकानाजवळील वादातून नवलानी यांच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला होता. त्यामुळे कालच्या घटनेला पूर्वीच्या वादाची किनार असल्याचीही चर्चा व्यापारी वर्तुळात आहे.

## सिद्धी बागेचे रूप पालटणार; नगरची जुनी ओळख पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न

### मनपाच्या सिद्धी बागेच्या नूतनीकरणासाठी महापौर-उपमहापौरांची बैठक संपन्न कन्सल्टंटकडून सादरीकरण; विविध सूचना देत विकास आराखड्यावर चर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सिद्धी बागेच्या नूतनीकरणासाठी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव व आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत कन्सल्टंटमार्फत सिद्धी बागेच्या विकास आराखड्याचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

यावेळी मनपा महिला बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप नगरसेवक निखिल वारे, जितू गंभीर, अभियंता आर. जी. मेहत्रे, गणेश गाडळकर आदी उपस्थित होते. सादरीकरणादरम्यान बागेच्या नूतनीकरणाच्या विविध बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली तसेच कन्सल्टंटला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, सिद्धी बाग ही नगरची एकेकाळची ओळख होती. ती ओळख पुन्हा जिवंत करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून नूतनीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. यासाठी डीपीआर मंजुरीच्या अनुषंगाने कन्सल्टंटकडून सादरीकरण करण्यात आले असून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, काही दिवसांपूर्वी सिद्धी बागेची पाहणी करण्यात आली होती. त्यानुसार कन्सल्टंट नेमून सविस्तर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्याचे सादरीकरण महापौर व आयुक्त यांच्या उपस्थितीत करण्यात आले. बैठकीत मिळालेल्या सूचनांनुसार आराखड्यात आवश्यक बदल करून अंतिम आराखडा मंजूर करण्यात येईल. सिद्धी बागेचे रूप पालटून नगरची ओळख अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ते म्हणाले.

आयुक्त यशवंत डांगे यांनीही सादरीकरणावेळी विविध सूचना मांडत बागेच्या विकासासाठी काही थीम्सची माहिती दिली. नागरिकांसाठी आकर्षक, सुबक व सर्व सुविधा असलेली बाग विकसित करण्याचा महापालिकेचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

## गॅस दरवाढीवर प्रशासनाची तातडीची कारवाई

### अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा-टॅक्सी संघटनेच्या मोर्च्यानंतर पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक; दरफलक लावणे व बिल देणे बंधनकारक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एलपीजी गॅस दरवाढीविरोधात अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेने काढलेल्या मोर्च्याची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पुरवठा अधिकारी हेमा बढे यांनी संघटनेचे पदाधिकारी व गॅस कंपन्यांच्या सेल्स मॅनेजर यांची बैठक घेऊन महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

फेब्रुवारी २०२६ पूर्वी ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर असलेला एलपीजी गॅस दर युद्धानंतर वाढत जाऊन सध्या १०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या दरवाढीमुळे रिक्षा चालकांचे आर्थिक गणित कोलमडले असून व्यवसाय करणे कठीण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गॅस कंपन्यांकडून मनमानी दरवाढ होत असल्याचा आरोप करत, वाहनांमध्ये गॅस भरताना कमी ॲव्हरेज मिळत असल्याने हेराफेरी होत असल्याचीही तक्रार मांडली. रिक्षा चालक दिवसभर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, मात्र वाढत्या दरांमुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे.

बैठकीदरम्यान पुरवठा अधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कंपनीकडून ज्या दराने गॅस व पेट्रोल पुरवठा होतो, त्याच दराने ग्राहकांना वितरण करावे. दरफलक (रेट बोर्ड) पंपावर दर्शनीय ठिकाणी लावावा. प्रत्येक ग्राहकाला गॅस भरण्यानंतर बिल देणे अनिवार्य

■ पान ४ वर

## 'मार्चएण्डला' जिल्ह्यात अवैध दारुविक्रेत्यांवर छापे

### एलसीबीच्या कारवाईत सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने विशेष मोहीम राबवून ३१ मार्च या एकाच दिवशी जिल्ह्यात २४ ठिकाणी छापे टाकून अवैध दारूविक्रेत्यांवर कारवाई केली. या मोहिमेत एकूण १ लाख ३६ हजार ८४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित विक्रेत्यांविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शिर्डी, संगमनेर एमआयडीसी, नेवासा, श्रीगोंदा, आश्वी, कोतवाली, श्रीरामपूर शहर, सोनई, राहुरी तसेच तोफखाना पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गोपनीय माहितीच्या आधारे ३१ मार्च रोजी एकाच दिवशी एलसीबीच्या विशेष पथकांद्वारे ही छापेमारी करण्यात आली. या कारवाईत शिर्डी ५, श्रीरामपूर शहर ४, संगमनेर तालुका २, राहुरी २, सोनई २, श्रीगोंदा १, आश्वी २, कोतवाली १, आणि तोफखाना १ व एमआयडीसी १ असे एकूण २४ गुन्हे नोंदविण्यात आले.

जिल्ह्यात अवैध दारूविक्रीच्या वाढत्या प्रमाणामुळे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी पाच पथके तयार करून कारवाईच्या सूचना केल्या होत्या.

■ पान ४ वर

## शहरात मुलींच्या हॉस्टेलसाठी जागा देणार - महापौर ज्योती गाडे

### माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव; सेवानिवृत्त सभासदांना कृतज्ञता निधीचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षक हे समाजाला दिशा देणारे असून सक्षम पिढी घडविण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य करतात. त्यांच्या कार्याची कृतज्ञता शब्दांत व्यक्त होऊ शकत नाही, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले. शिक्षकांमध्ये काटकसरीचा गुण असून, संचालक मंडळही त्याच पद्धतीने संस्थेचा कारभार करत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच मुलींसाठी हॉस्टेल उभारण्यासाठी महापालिकेमार्फत सोसायटीला जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ आणि सेवानिवृत्त सभासदांचा कृतज्ञता सोहळा नगर-कल्याण रोडवरील जाधव लॉन्स येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या सोहळ्यास उपमहापौर धनंजय जाधव, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, संचालक बाबासाहेब बोडखे,

■ पान ४ वर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुरेश बनसोडे

### मार्गदर्शक पदी अशोकराव गायकवाड, कार्याध्यक्ष पदी सुमेध गायकवाड, निमंत्रक पदी अजय राव साळवे, सचिव पदी किरण दाभाडे यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरात भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे. या महोत्सवाची सुरुवात ९ एप्रिलपासून होणार असून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पत्रकार परिषदेत आयोजकांनी सांगितले की, यंदा जयंती मोठ्या उत्साहात आणि एकजुटीने साजरी केली जाणार आहे. शहरातील तसेच उपनगरातील सर्व मंडळांचा या महोत्सवात सहभाग असणार असून, पूर्णाकृती पुतळ्यासमोरील मैदानावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

महोत्सवानिमित्त चित्रकला, रांगोळी, निबंध, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. १४ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून ती शांततेच्या मार्गाने पार पाडण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

९ एप्रिल रोजी प्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांचा गायनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंतीही समितीच्या वतीने साजरी करण्यात येणार आहे.



अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुरेश बनसोडे यांनी सर्वांचे आभार मानून शहरातील आंबेडकरी समाजासह सर्व नागरिकांनी या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले. नगरसेवक मयूर बांगरे यांनी १४ एप्रिल हा दिवस केवळ सुट्टी म्हणून न साजरा करता एकत्र येऊन जयंती उत्साहात साजरी करण्याचे आवाहन केले. जयंती महोत्सव सुमारे पंधरा दिवस चालणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी सर्वानुमते डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक सुरेश भाऊ बनसोडे यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड ,नगरसेवक मयूर बांगरे, सुनील शिंदे,

, जयंत गायकवाड, प्रा. विलास साठे, किरण दाभाडे, अंकुश मोहिते, समीर भिंगारदिवे, सिद्धार्थ आढाव, येसुदास वाघमारे आदींसह समितीचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समितीची सविस्तर रचना पुढीलप्रमाणे- मार्गदर्शक अशोक गायकवाड, अध्यक्ष सुरेश भाऊ बनसोडे, कार्याध्यक्ष सुमेध गायकवाड, निमंत्रक - अजय राव साळवे, सचिव किरण दाभाडे,

उपाध्यक्ष -, विशाल गायकवाड, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, अमित काळे, सुजित घंगाळे, विनोद भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, जय कदम, विजय गायकवाड, दीपक लोंढे, सुनील कांबळे, अक्षय भिंगारदिवे, विजय भिंगारदिवे, विशाल कांबळे, सागर ठोकळ

क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख - प्रा जयंत गायकवाड , प्रा विलास साठे , प्रा जाधव एल बी , प्रा डी आर जाधव, प्रा. पगारे सर, प्रसिध्दी प्रमुख - महेश भोसले , सचिन मोकळं , संदीप शिंदे

सल्लागार जेवियर भिंगारदिवे, लॉरेन्स स्वामी, , नगरसेवक मयूर बांगरे, संभाजी भिंगारदिवे, सुनील शेत्रे, सुनील साळवे, परिमल निकम ,संजय जगताप, प्रवीण चाबुकस्वार, विजय गव्हाळे, महेंद्र राजगुरू, अँड संदीप पाखरे, दीपक अमृत, विजय भांबळ, सुनील शिंदे, सदाशिव भिंगारदिवे, जयाताई गायकवाड, गौतमी भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, किरण गायकवाड, दीपक पाटोळे , दीपक अमृत, मिरवणूक नियोजन समिती- शुभम भिंगारदिवे, राजू दाभाडे, विशाल साळवे, आकाश सरोदे, अजय शेळके, जय कदम, सुजित घंगाळे, विशाल गायकवाड, सिद्धांत वाकचौरे, समीर भिंगारदिवे, संजय साळवे आदी मान्यवरांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

एकूणच, शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि उत्साहाचा संदेश देणारा भव्य महोत्सव साजरा होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## दै. आकर्षण निवडक

### नाना पाटील वस्ताद तालीमच्या वतीने हनुमान जयंती साजरी



**अहिल्यानगर- शक्ती आणि भक्तीचा मिलाप म्हणजे बजरंगबली होय. प्रभु रामचंद्रांची निःस्सीम भक्ती करुन निष्ठा कशी असावी भगवंत हनुमानांनी आपल्या सेवेतून दाखवून दिले आहे. हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकृत करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन नगरसेवक गणेश कवडे यांनी केले. हनुमान जयंतीनिमित्त नाना पाटील वस्ताद तालिमच्यावतीने कावडीने आणलेल्या पवित्र पाण्याने जलअभिषेक करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक गणेश कवडे, पै. मन्नी शिंदे, अनिल कवडे, बजरंग महाराज शेळके, राधेशाम धूत , अमर शिंदे ,ओंकार कवडे ,सुनील कवडे ,शिवाजी गुंजाळ ,अभिषेक शेळके ,शिवकुमार शेळके ,अनिरुद्ध कवडे ,शैलेश काळे ,निलेश काळे ,सचिन वामन ,नितीन रोहकले ,योगीराज वामन ,धीरज रोहकले ,दत्ता ढाकणे ,राजू म्हस्के ,बाळू दिवेकर ,अतुल वाकचौरे, आदि उपस्थित होते. पुढे बोलतांना गणेश कवडे म्हणाले, हनुमान जयंतीची नालेगांवची मोठी परंपरा आहे. दरवर्षी नालेगांव येथील नाना पाटील वस्ताद तालिम येथील युवकांनी सालाबाद प्रमाणे प्रवरासंगम येथून कावडीने पाणी आणून जलाभिषेक केला जातो. युवकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री हनुमानाची उपासना करुन अनेक कुस्तीची मैदानी गाजवली आहेत.यावेळी नाना पाटील वस्ताद तालिम येथे आकर्षक सजावट करण्यात आली होती .**

### ३ एप्रिलपासून नगरमध्ये प.पू.राधाकृष्ण महाराजांचा श्रीमद् भागवत कथा



**अहिल्यानगर- येथील श्री.रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवाराने नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ शुक्रवार दि.३ एप्रिलपासून मोठ्या भक्तीपूर्ण वातावरणात करण्यात येणार आहे. दि.९ एप्रिल २०२६ पर्यंत चालणाऱ्या या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत जोधपूरनिवासी प.पू.गोवत्स श्री राधाकृष्ण महाराजांच्या अमृतवाणीतून श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्याचे भाग्य नगरकरांना लाभणार आहे. या ज्ञानयज्ञ सोहळ्याची नियोजन बैठक नुकतीच पटेलवाडी मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. बैठकीस शहरातील वैष्णव समाजातील मान्यवर प्रतिष्ठित आणि भाविक मंडळी उपस्थित होती. दीपप्रज्वलनाने बैठकीचा श्रीगणेशा करण्यात आला. शरद झंवर यांनी प्रास्ताविक केले. कल्पेश इंदानी व महेश इंदानी यांनी कथेच्या आयोजना संदर्भात माहिती दिली. रामेश्वर बिहाणी व बजरंग दरक यांनी प्रचार, प्रसार संदर्भात मार्गदर्शन केले.बैठकीस सर्वश्री श्रीगोपालजी धूत, मोहनलाल मानधना, नंदलाल मणियार, राजेंद्र चोपडा, रामनिवास इंदानी, मगनभाई पटेल, प्रदीप पंजाबी आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांनी उपयुक्त सुचना केल्या.संपूर्ण वैष्णव समाज आणि सर्व नगरकरांसाठी इंदानी परिवाराने या कथा श्रवणाचा अमृत योग घडवून आणल्याबद्दल उपस्थित सर्वांनी इंदानी परिवाराचे अभिनंदन केले. कथा स्थळी उत्तम बैठक व्यवस्था करण्यात आली असून शुध्द पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली आहे. या कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा शहरासह उपनगरातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन इंदाणी परिवाराने आणि संपूर्ण वैष्णव समाजाचेवतीने करण्यात आले आहे.**

# अहिल्यानगरात गुड फ्रायडे व इस्टरनिमित्त चर्चांना पोलीस संरक्षणाची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आगामी गुड फ्रायडे (उत्तम शुक्रवार) व इस्टर संडे (येशू ख्रिस्त पुनरुत्थान दिन) निमित्त जिल्ह्यातील सर्व चर्चांना कडक पोलीस संरक्षण देण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश ख्रिश्चन सेल, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार पक्ष) यांच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना ख्रिश्चन सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांनी निवेदन सादर केले. यावेळी राजू भिंगारदिवे, विजय साताळकर, विनायक पंडित, राजू पारदे, राजेश शिंदे, किरण पगारे, अशोक पठारे, मनोज शिंदे, किरण ठोंबरे, विल्यम साठे, वैभव जाधव, शंभू विल्यम, शमुवेल पाचरणे, मधुकर नेटके, लवेश नेटके, कारभारी साठे, क्रिश भुजबळ, शोभा पातारे, संजय भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दिनांक ३ एप्रिल २०२६ (गुड फ्रायडे) व ५ एप्रिल २०२६ (इस्टर संडे) रोजी जिल्ह्यातील विविध चर्चमध्ये पहाटेपासून धार्मिक विधी व प्रार्थना कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने श्रद्धाळू उपस्थित राहण्याची शक्यता असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये चर्च ऑफ नॉर्थ इंडिया (), रोमन कॅथोलिक, साल्व्हेशन आर्मी, विश्ववाणी, बिलिव्हर्स चर्च तसेच इतर चर्चमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होणार आहेत. कोणत्याही समाजकंटकांकडून अडथळा निर्माण होऊ नये व धार्मिक सौहार्द कायम राहावे यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ख्रिश्चन समाज शांतताप्रिय असून सर्व धार्मिक कार्यक्रम निर्विघ्न पार पडावेत यासाठी प्रशासनाने तात्काळ सर्व पोलीस ठाण्यांना आवश्यक त्या सूचना देऊन योग्य तो बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनाची प्रत महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक, नाशिक विभागाचे विशेष पोलीस महासंचालक तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांनाही पाठविण्यात आली आहे.

# नगरमध्ये कँडल मेकिंग कार्यशाळेत सुंदर कल्पकतेचा आविष्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगरमधील कॅफे ला फावोरिटा ल्यू येथे आयोजित करण्यात आलेला ‘‘कँडल मेकिंग वर्कशॉप’’ अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. या कार्यशाळेचे मार्गदर्शन रिषिता दिवांशु मुनोत यांनी केले आणि त्यांनी अतिशय कलात्मक व नावीन्यपूर्ण पद्धतीने सहभागींना मार्गदर्शन केले.

या वर्कशॉपमध्ये सहभागीऔनी विविध प्रकारचे डेजर्ट कँडल्स तयार केले. कपकेक कँडल, आईस्ड लॅटे कँडल, केक कँडल, मूस कँडल आणि शॅम्पेन कँडल अशा अनेक आकर्षक प्रकारांमुळे कार्यशाळेला एक वेगळीच रंगत आली. प्रत्येक कँडल वेगळ्या रंगात, सुगंधात आणि कल्पनेतून साकारलेली होती, ज्यातून प्रत्येकाची सर्जनशीलता सुंदरपणे दिसून आली.

रिषिता यांनी कँडल मेकिंगची संपूर्ण प्रक्रिया सोप्या आणि रंजक पद्धतीने शिकवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रत्येक सहभागीला स्वतःची कँडल तयार करण्याचा आत्मविश्वास मिळाला.

संपूर्ण सत्रात सहभागींचा उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत होता.

हा वर्कशॉप केवळ शिकण्याचा अनुभव नव्हता, तर प्रत्येकासाठी सर्जनशीलतेचा आनंद साजरा करण्याचा एक खास क्षण ठरला.

# महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श – रवींद्र भोसले

## अहिल्यानगर जिल्ह्यात पहिली महिला मापाडी कामगार म्हणून पुष्पा कदम यांचा सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत पहिल्या महिला मापाडी कामगार होण्याचा मान मिळवणार्या श्रीमती पुष्पा सुरेश कदम यांचा अहिल्यानगर येथे स्व. शंकरराव घुले माथाडी कामगार पतसंस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. परंपरेने पुरुषप्रधान समजल्या जाणार्या मापाडी कामगार क्षेत्रात त्यांनी केलेली ही ऐतिहासिक कामगिरी महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

यावेळी हमाल पंचायतीचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले, तज्ञ संचालक संजय घुले, माथाडी पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले, हमाल पंचायतचे उपाध्यक्ष गोविंदराव सांगळे, सचिव मधुकर केकान, पतसंस्थेचे सचिव बबनराव सुसे, संचालक आदिनाथ चेके, रतनबाई आजबे, मंदाबाई सूर्यवंशी, भैरू कोतकर, भाऊसाहेब शेळके, वाल्मिक कदम, दीपक ढोणे, रामचंद्र साळुंखे, अशोक म्हस्के, विजय अहिरे, विकास खोतकर, संतोष जाधव, शाहूल वडागळे, कैसर पठाण, विशाल साळवे, असिफ कादरी, तबाजी कारले, अर्जुन शिंदे यांच्यासह हमाल पंचायत पतसंस्थेचे कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माथाडी पतसंस्थेचे चेअरमन रविंद्र भोसले यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, पुष्पा कदम यांचे कार्य हे केवळ वैयक्तिक यश नसून समाजातील परिवर्तनाचे प्रतीक आहे. महिलांनी पुढे येऊन काम केल्यास समाज अधिक सक्षम होईल. अशा महिलांना प्रोत्साहन देणे ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांसुधा याचा आदर्श घ्यावा. मापाडी कामगार क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवणे ही काळाची गरज आहे. महिलांना योग्य संधी, प्रशिक्षण आणि पाठबळ दिल्यास त्या कोणतेही काम सक्षमपणे पार पाडू शकतात, हे पुष्पाताईनी सिद्ध करून दाखवले आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून महिलांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अविनाश घुले म्हणाले की, आजचा दिवस केवळ एका व्यक्तीच्या सन्मानाचा नाही, तर संपूर्ण महिला वर्गाच्या सन्मानाचा आहे. पारंपरिक बंधने झुगारून महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवली आहे. पुष्पा कदम यांनी मापाडी कामगार म्हणून केलेली सुरुवात ही इतर महिलांसाठी नवा मार्ग दाखवणारी ठरेल. त्यांच्या या धाडसामुळे समाजातील जुन्या समजुती मोडीत निघतील.

# नो-ड्रोन झोनमध्ये ड्रोन उडवला; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** नाथसागर जलाशय परिसरात नो–ड्रोन झोन असताना विनापरवाना ड्रोन उडवून व्हिडिओ चित्रीकरण केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनोज राजेंद्र देहाडे (वय २६, रा. म्हाडा कॉलनी, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर) असे आरोपीचे नाव आहे. १५ मार्च रोजी सकाळी साडेनऊ ते सव्वादहा वाजेदरम्यान नाथसागर जलाशय येथे ही घटना घडली.

दहशतवाद विरोधी शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दिनकर शिवाजीराव गोरे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. आरोपीने _’’ या इंस्टाग्राम खात्यावरून ड्रोनद्वारे चित्रीकरण करून संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याचे तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम २२३, वायुमान अधिनियम १९३४ तसेच ड्रोन नियम २०२१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जिवडे करीत आहेत.

# प्रभाग क्रमांक १३ मध्ये कमी दाबाचा पाणीपुरवठा; नगरसेवकांचा पालिका प्रशासनाला अल्टिमेटम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक १३ मधील शांतीनगर, केदार वस्ती, कोंबडीवाला मळा परिसर, शक्ती नगर, चोधरी नगर ,कानडे मळा परिसर ,सर्व मंगल कार्यलय परिसर ,आशीर्वाद कॉलेनी, मोहटा देवी कॉलनी, अरिहंत कॉलेनी, विद्यासागर कॉलेनी, सावता नगर अशा प्रभाग क्रमांक १३ मधील अनेक भागामध्ये गेल्या कित्येक दिवसांपासून अत्यंत कमी दाबाने पाणी येत असून नागरिकांचा संताप उसळला आहे. दररोज तासन्तास नळाजवळ वाट पाहूनही पुरेसे पाणी न मिळाल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वरच्या जलकुंभातून पाणीपुरवठा सुरळीत नसल्याचे कारण नेहमी देण्यात येत असल्याने लोकांमध्ये प्रशासनाबद्दल नाराजी वाढत आहे.



कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यामुळे गृहिणींना स्वयंपाक, धुणीभांडी, पिण्याचे पाणी साठवणे अशा मूलभूत गरजा पूर्ण करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही भागांमध्ये तर दिवसाआड पाणी मिळण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत. सततच्या निवेदनांनंतरही पालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने लोकांमध्ये नाराजी तीव्र झाली आहे.

या गंभीर समस्येबाबत नगरसेवक नगरसेवक अविनाश घुले यांनी संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, ‘‘प्रभाग क्रमांक १३ मधील जनता दररोज पाण्यासाठी हाल सोसत आहे. कमी दाबाने पाणी येत असल्याने अनेक कुटुंबांना पिण्याचे पाणी मिळणेही कठीण झाले आहे. नागरिकांच्या या मूलभूत प्रश्नावर पालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. दुर्लक्ष झाल्यास आम्ही नागरिकांसह तीव्र भूमिका घेत आंदोलन उभारू.’’प्रशासनाला इशारा दिला. ते म्हणाले, ‘‘प्रत्येक वेळी ‘वरून पाणी बंद आहे’ हेच कारण सांगून विषय टाळला जात आहे. पाणीपुरवठा तपासणी, पाइपलाइन दुरुस्ती, दाब नियंत्रक प्रणाली याबाबत कोणतीही ठोस कारवाई होत नाही.



## श्री नृसिंह तपोवन येथे विजय मारुती मंदिरात जन्मोत्सव

अहिल्यानगर- सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील श्री नृसिंह तपोवन येथील विजय मारुती मंदिरात आज सकाळी ०६.३३ मिनिटांनी श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. देवस्थानच्या गुरुजींनी रुद्र पठण व वेद मंत्रोचाराचे पठण करून महाआरती संपन्न झाली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# आरपीआय (गवई)ची नव्याने कार्यकारिणी जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाची शहरातील महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच उत्साहात पार पडली. या बैठकीत शहराची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के व महिला आघाडीच्या ज्योतीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. शहर, उपनगर तसेच नगर तालुक्यातील कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बैठकीत बोलताना सुशांत म्हस्के यांनी सांगितले की, काही महिन्यांपूर्वी पक्षाची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर जुने व नवीन कार्यकर्ते यांचा समन्वय साधत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून संधी देण्यात आली असून, पक्ष हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून सर्व जाती–धर्माला सोबत घेऊन वाटचाल करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

नवीन पदाधिकाऱ्यांना एका वर्षाचा कार्यकाळ देण्यात आला असून, त्यांनी प्रभावी काम करून पक्षविस्तार करावा व अधिकाधिक कार्यकर्ते जोडावेत, असे आवाहन करण्यात आले. समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय किंवा अत्याचार झाल्यास पक्ष त्याविरोधात आवाज उठवून न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही म्हस्के यांनी नमूद केले. सध्या जाती–धर्मात भांडण लावण्याचे राजकारण सुरू असून, अशा परिस्थितीत पक्षाची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

लवकरच जिल्हाव्यापी मेळावा आयोजित करण्यात येणार असून, या मेळाव्यासाठी पक्षप्रमुख राजेंद्र गवई उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच युवकांना जिल्ह्यात काम करण्याची मोठी संधी असून, गावागावातील प्रश्न सोडविण्यासाठी युवकांनी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले. आगामी राहुरी विधानसभा निवडणुकीत पक्षाचा उमेदवार देण्यात येणार असल्याचेही संकेत त्यांनी दिले.

या बैठकीत शहर जिल्हा कार्याध्यक्ष दानिश शेख, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष गुलामअली शेख, युवक शहराध्यक्ष विजय शिरसाठ, अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष नईम शेख, अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अजीम खान, नगर तालुका अध्यक्ष सचिन शिंदे, भिंगार शहराध्यक्ष स्वप्निल साठे, अल्पसंख्यांक शहर जिल्हा कार्याध्यक्ष मुस्तफा शेख, शहर सचिव विनीत पाडळे, युवक आघाडी शहर जिल्हा कार्याध्यक्ष लकी वाघमारे, युवक शहराध्यक्ष उमेश गायकवाड, नगर तालुका युवक अध्यक्ष विपुल भोसले, तालुका युवक कार्याध्यक्ष रोहित थोरात, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष जमीर शेख, ओबीसी आघाडी शहर जिल्हाध्यक्ष हर्षल जाधव, शहर उपाध्यक्ष निजाम शेख, अरबाज शेख, ओबीसी आघाडी शहर जिल्हाध्यक्ष विकास पटेकर, शहर उपाध्यक्ष जावेद सय्यद, हुसेन चौधरी, अमोल चव्हाण, युवराज कंडारे, कायदा सल्लागार आघाडी शहर जिल्हाध्यक्ष आदिल शेख, शहर संघटक आफताब बागवान, शहर उपाध्यक्ष युवक आघाडी योहान चाबुकस्वार, वैद्यकीय आघाडी शहर जिल्हाध्यक्ष इमरान शेख, वाहतूक आघाडी शहर जिल्हा अध्यक्ष निखिल मगर यांची निवड करण्यात आली.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबावदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

# श्रीगोंदा आगारातील कथित भ्रष्टाचाराविरोधात अर्धनग्न आमरण उपोषण सुरु




अहिल्यानगर- सर्जेपुरा रामवाडी येथील एसटी महामंडळाच्या कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक सुधीर ठोंबरे यांनी श्रीगोंदा आगारातील कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ अर्धनग्न अमरण उपोषण सुरू केले आहे. संबंधित प्रकरणात मुख्य कारागीरावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.या उपोषणावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, अण्णा राऊत, अमित शेटे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.निवेदनात म्हंटले आहे की, श्रीगोंदा आगारातील मुख्य कारागीर मंगेश गोरे यांनी शहरातील नामांकित ऑटोमोबाईल दुकानांमधून बोगस बिले तयार करून लाखो रुपयांचे साहित्य खरेदी केल्याचा बनाव करत मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.या संदर्भात माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत माहिती मागविण्यात आली असता संबंधित कागदपत्रांमध्ये अपूर्ण माहिती आढळून आली. तसेच सादर केलेल्या बिलांमध्ये अनियमितता दिसून येत आहे तसेच सर्व बिलांवर डेपो मॅनेजर यांच्या देखील सह्या आहे त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.दरम्यान, या प्रकरणात तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# डोंगरे यांना पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार प्रदान

अहिल्यानगर - तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना जळगाव येथे पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. अल्पबचत भवन, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात नंदूरबारचे उपजिल्हाधिकारी मनोज देशमुख यांच्या हस्ते डोफ्लगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सतीश बावीस्कर, जळगाव सोसायटीचे संचालक विजय पवार, माजी मुख्याध्यापक शब्बीर शेख, एकता संघटनचे अध्यक्ष फारुक शेख, हकीम चौधरी, फारुक पटेल, संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख आदी उपस्थित होते.सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन डोंगरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे. स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जनजागृती मोहीम, रक्तदान शिबिरे यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविले जात आहेत. युवकांसाठी व्यसनमुक्ती संदर्भातील कार्यक्रम, तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्यसेवा देण्याचे कार्यही संस्थेमार्फत सुरू आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलनांच्या आयोजनातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी पै. नाना डोंगरे यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत.

# ढोकेश्वर महाविद्यालयात माजी विद्यार्थी व पालक मेळावा संपन्न

## सिताराम खिलारी यांनी केले मार्गदर्शन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालया मध्ये माजी विद्यार्थी व पालक मेळावा संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी जिल्हा मराठा शिक्षण संस्थेचे विश्वस्त सिताराम खिलारी होते.

प्रमुख पाहूणे म्हणून हभप बाबा महराज शिंदे हभप प्रसाद महाराज खिलारी गमविस्तार अधिकारी संपत दातीर श्रावण गायकवाड बाबा साहेब मंचरे विलास ठुबे प्राथमिक शिक्षिका संध्या घोलप यांच्या सह पालक व माजी विद्यार्थी उपस्थित होते .

सिताराम खिलारी यावेळी बोलताना म्हणाले की पालक आणि माजी विद्यार्थी यांच्या सहयोगा तुन महाविद्यालयाची प्रगती सहज होईल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या महाविद्यालयाने ज्ञानाचे भांडार खुले करून दिले बाबासाहेब शिंदे यावेळी म्हणाले की या महाविद्यालयाने आमच्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला सामाजिक काम करण्याचे बाळकडू मिळालं प्राचार्य लक्ष्मण मतकर यांनी पालक आणि विद्यार्थी सहयोगातुन महाविद्यालयाची प्रगती साधता आली या साठी आपणा सर्वांचे सहकार्य महत्वाचे आहे कार्यक्रमाचे प्रस्ताविकात प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा देऊन माजी विद्यार्थ्याचे महाविद्यालयाचे प्रगती मध्ये मोठे योगदान आहे कार्यक्रमाच सुत्र संचालन प्रा. डॉ. जिजाभाऊ घुले यांनी केले तर आभार उपप्राचार्च विरेंद्र धनशेट्टी यांनी मानले

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या महासंचालकपदी प्रविण पाटील यांची नियुक्ती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रशी गेल्या दशकभरापासून घट्ट नातं जपणारे आणि राज्यातील सायकलिंग चळवळीचे एक भक्कम आधारस्तंभ ठरलेले प्रविण व्ही.पाटील यांची महासंचालक आणि कार्यकारी अधिकारी म्हणून राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची पदी सायकलिंग असोसिएशन ऑफ इंडिया मध्ये नियुक्ती झाली.ही महाराष्ट्रातील सायकलिंग क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.१एप्रिल २०२६ पासून नवी दिल्ली येथे पदभार स्वीकारला आहे.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या दृष्टीने ही केवळ वैयक्तिक यशाची बाब नसून,संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणि राज्यातील सायकलिंग खेळासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे.

गेल्या १० वर्षांत प्रविण पाटील यांनी संघटनेसोबत काम करताना सायकलिंगच्या विकासासाठी सातत्याने योगदान दिले आहे.ते संघटनेचे एक भक्कम आधार स्तंभ राहिले असून, कै.प्रताप जाधव यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात सायकलिंगसाठी मजबूत पायाभूत सुविधा उभारण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.तसेच,एशियन सायकलिंग कोनफिडीशन माजी जनरल सेक्रेटरी सरदार ओंकार सिंग पाटील,फेडरेशन ऑफ इंडिया अध्यक्ष पंकज सिंग आणि जनरल सेक्रेटरी मनिंदर पाल सिंग यांनी भारतीय सायकलिंगसाठी घातलेल्या भक्कम पायाभरणीचे सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र तर्फे विशेष कौतुक करण्यात येते.

नव्या जबाबदारीच्या प्रवासात प्रविण पाटील यांच्यासोबत अजीत सिंग (टेक्निकल डायरेक्टर), डॉ.धर्मेंद्र लांबा,अंकाक्षा दहात,प्रिया चिप आणि राकेश कुमार आदी सक्षम टीम कार्यरत आहे.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी देखील या यशाबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.मा.ना.श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले साहेब महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री तथा पालकमंत्री लातूर जिल्हा,संघटनेचे अध्यक्ष अँड.विक्रम रोठे, उपाध्यक्ष अविनाश कदम,यशवंत नडगम, धनंजय वानखेडे,अभिजीत मोहिते तसेच मानद सचिव प्रा.संजय साठे आणि खजिनदार भिकन अंबे,प्रा. साईनाथ थोरात यांनी प्रविण पाटील यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला पूर्ण विश्वास आहे की प्रविण. व्ही. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सायकलिंग नव्या उंचीवर पोहोचेल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अधिक उंच फडकवेल. सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र च्या सर्व पदाधिकारी व खेळाडू यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉक्टर सुभाष म्हस्के एक मनस्वी मित्र

तसा डॉक्टर साहेबांचा परिचय आमच्या भोर परिवाराचे जुन्या पिढीतील संबंधित किंवा काका यांचे धाकटे चिरंजीव. काकांकडे लहानपणापासून जाणे येणे असल्यामुळे परिवारातील सगळ्यांचीच ऐकून माहिती. तशी डॉक्टर साहेबांची काकांच्या ७७ च्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ओझरती ओळख. किं बा काकांचे हे धाकटे चिरंजीव मेडिकलला असून पुण्यातील बीजे मेडिकल कॉलेजमधून एम एस ऑर्थो करत आहेत हे समजल्यामुळे एक वेगळीच आपुलकीची भावना निर्माण झाली. नगर मधील हाताच्या बोटावर मोजता येतील अशा काही ऑर्थोपेडिक सर्जन मध्ये डॉक्टरांचे नाव नोंदवलं गेलं. स्वतःची उपचत अंगहुशारी आणि मेहनतीच्या जीवावर डॉक्टर मस्के यांनी नाव कमावले. अगोदर तेली खुंटावर त्यानंतर कोठला परिसरात आणि त्यानंतर सावेडी रोडवर डॉक्टर साहेबांनी स्वतःचे हॉस्पिटल चालवले.

आमदार काकांच्या कार्यकर्तृत्वाचा डॉक्टरांना अतिशय अभिमान. ग्रामीण भागातून येऊन स्वतःच्या हुशारीच्या जीवावर वैद्यकीय क्षेत्रात प्रचंड यश मिळवलं परंतु समाजाप्रती असणार ऋण कायम लक्षात ठेवत समाजकारणाची पायवाट अगोदर स्वीकारली आणि मग राजकारणाचा विचार.

१९७७ च्या विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी अतिशय पातळीहीन प्रचार करत काकांचा पराभव केला याचं डॉक्टरांना अतिशय दुःख होत असे. वास्तविक काका हे अतिशय अभ्यासू आमदार सर्वसामान्यांचे प्रश्न समजावून घेणारे आणि ते योग्य त्या प्लॅटफॉर्मवर नेऊन विधायक काम करणारे अशी काकांची प्रतिमा. १९७२ च्या दुष्काळात नगर तालुक्यामध्ये गावाच्या संख्येपेक्षा जास्त म्हणजे १२५ पाझर तलाव बांधून घेण्याची किमया किंवा काकांनी करून दाखवली होती. आणि ही पाझर तलावाची संकल्पना काकांनी असेंबली मध्ये कायदा करून राजमान्य केली होती. परंतु काकांचा पराभव झाला.

त्यामुळे काकांच्या पराभवाला कारणीभूत असलेल्या सर्व घटकांचा तौलनिक अभ्यास करत डॉक्टर साहेबांनी राजकीय प्रवास सुरू केला. काकांच्या विरुद्ध कार्यरत श्रेष्ठींच्या विरुद्ध भूमिका घेत डॉक्टरांची राजकीय वाटचाल असे. त्यामुळे डॉक्टर मस्के पहिल्यांदा तत्कालीन खासदार यशवंतराव गडाख साहेब यांच्या संपर्कात आले आणि त्यांच्याबरोबर काम करू लागले. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत यशवंतराव गडाख आणि बाळासाहेब विखे या सामन्यात डॉक्टर गडाखांच्या बाजूने अक्षरशः तन मन धनाने लढले.

दरम्यान सामाजिक कामाची उर्मी त्यांना माजी आमदार कि बा उर्फ काकासाहेब मस्के मेडिकल फाउंडेशन स्थापन करण्यापर्यंत घेऊन गेली. क्रमशः

**अॅड. सुभाष विठ्ठल भोर**

# शिव आरोग्य योजना शेतकरी ग्रामस्थांसाठी संजीवनी ठरेल - आ. काशिनाथ दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** नगर तालुक्यातील जखणगाव हे आरोग्यदायी गाव म्हणून राज्यातच नाही तर देशात सुप्रसिद्ध आहे. या गावांमध्ये ग्रामपंचायत व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यांचे मार्फत गावातील अधिकृत हॉस्पिटल च्या सहकार्याने यंदाच्या नवीन आर्थिक वर्षापासून शिव आरोग्य योजना सुरू करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथजी दाते सर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. जखणगाव मध्ये चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या कीर्तन सेवेपश्चात आमदारा दातेंनी शिवआरोग्य योजना जखणगावकरांसाठी अधिकृतपणे सुरू झाल्याचे जाहीर केले. या योजनेमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पिकवलेले पाच पायल्या धान्य किंवा फळे, भाजीपाला वार्षिक देणगी म्हणून जमा केल्यावर त्यांना वर्षभर सर्व प्रकारच्या आरोग्यसेवा मोफत पुरवण्यात येतील.

या योजनेची प्रस्तावना करताना गावचे सरपंच डॉ.सुनील गंधे यांनी या योजनेमार्फत करण्यात येणाऱ्या तपासण्या,उपचार व औषधांचे नियोजन याबाबत सविस्तर माहिती सांगितली. गोळा झालेल्या या धान्याचा, भाजीपाला व फळांचा वापर या योजनेत सक्रिय सेवा देणाऱ्या सर्व डॉक्टर्स व आरोग्यदुतांच्या कुटुंबाना वितरित करून सेंद्रिय खाद्यपदार्थांच्या वापरानेकिमान त्यांच्या कुटुंबातील आरोग्य व्यवस्था सुदृढ होईल. मोबदल्यात आरोग्य सेवा गावातील परिवारांना पुरवताना सेवाभावी कार्य म्हणून त्यांच्या हातून धर्मकार्य व पुण्य कार्य घडेल. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी



या म्हणीप्रमाणे रुग्ण व डॉक्टर्स यांचे नाते व्यावहारिक न राहता जिव्हाळ्याचे निर्माण होईल.

या कार्यक्रमास हरी भक्ती परायण योगेश महाराज शिंदे, उद्योजक बापूशेठ सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ वाळके, देवस्थानचे अध्यक्ष भाऊसाहेब कर्डिले, सौ. नंदाताई बबन कर्डिले, बचत गट प्रतिनिधी श्रीम. रंजनाताई गंधे, माजी सरपंच बबनराव कर्डिले, मनोहर काळे, निलेश भिसे, राजू काका कर्डिले, सुभाषराव सौदागर, भीमराज सौदागर, गोवर्धन गुंड, गणेश वाळके यांचे सह असंख्य जनसमुदाय उपस्थित होता. या योजनेत भाग घेणाऱ्या ग्रामस्थांना शिवा आरोग्य योजनेचे विशेष कार्ड यावेळी वाटण्यात आले. ते कार्ड दाखवल्यावर नेमून दिलेल्या हॉस्पिटल व ओपीडीमध्ये अशा गावकऱ्यांना एक रुपयाही भरावा लागणार नाही. रक्त तपासण्या, डिजिटल एक्स–रे, इसीजी व उपलब्ध औषधोपचार संपूर्णतः मोफत असून सोनोग्राफी, सिटीस्कॅन, एमआरआय, अंजीओग्राफी अशा तपासण्यांमध्ये विशेष सवलत देण्यात येणार आहे. तसेच मेडिकलच्या दुकानातून खरेदी कराव्या लागणाऱ्या औषधावर त्यांच्या किमतीत खास सूट देण्यात येणार आहे. भारतामध्ये प्रथमच हा प्रयोग गाव पातळीवर संपूर्ण आरोग्यग्राम या दृष्टीने राबविण्यात येत असून हा नक्कीच यशस्वी होईल व शासनाला पथदर्शी ठरेल असे मत जखणगांव उपकेंद्रातील आरोग्यसेवक भगवाने यांनी व्यक्त केले.आपल्या देशात आर्थिक वर्ष हे एक एप्रिल पासून सुरू होत असते कारण त्यापूर्वी रब्बी हंगामातील अन्नधान्याची शेतकऱ्यांकडे आवक झालेली असते. त्यामुळेच मार्चला पूर्वी घेतलेले कर्ज परतफेडीची अंतिम मुदत असते. हिंदू धर्म परंपरेप्रमाणे नवीन वर्ष सुद्धा चैत्र महिन्यापासून म्हणजेच याच काळात सुरु होते.याच पार्श्वभूमीवर यंदाच्या आर्थिक वर्षापासून ही योजना शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनाचा विचार करून सुरू करण्यात आली आहे. जे गावकऱ्यांना शेती नाही किंवा शेतीत पुरेसे धान्य झाले नाही अशांसाठी मानसी ५०० रुपये भरून यात सहभागी होता येईल.

# समाजात नम्रता, प्रेम व दया जोपासा - ह.भ.प. श्वेताताई बडे महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. श्वेताताई महाराज बडे यांची कीर्तन सेवा मोठ्या भक्तिभावात संपन्न झाली. या कीर्तनातून संत विचारांचे महत्त्व, नम्रतेचे स्थान आणि परमार्थाची गरज यावर प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कीर्तनातून मार्गदर्शन करताना श्वेताताई महाराज बडे म्हणाल्या की, मनुष्याने समाजामध्ये वावरताना नम्रता अंगीकारणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जागी स्थिर राहायचे असेल तर त्याने नम्रतेने वागले पाहिजे. संतांच्या जीवनात नम्रता, प्रेम, दया आणि जगाच्या कल्याणासाठी असलेले धार्मिक विचार यांचा मोठा साठा आहे. त्यांच्या विचारांमुळेच समाजाला योग्य दिशा मिळते.



त्या पुढे म्हणाल्या की, संतांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत आणि आपल्या जीवनामध्ये त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. संतांचे विचार हे प्रेरणादायी असून आजच्या काळात त्यांची खरी गरज आहे. जसे भाजीमध्ये मीठ महत्त्वाचे असते, तसेच आपल्या जीवनामध्ये संतांचे स्थान आहे. संतांचे विचार नसतील तर जीवनाला चव राहत नाही.श्वेताताई महाराज बडे यांनी पुढे स्पष्ट केले की, आपल्या जीवनामध्ये साधू सेवा, परमार्थ आणि चांगले कार्य असणे गरजेचे आहे. आपल्याला मिळालेले हे मानव जन्म काहीतरी चांगले करण्यासाठी आहे. संत आपल्याला थेट धन देत नाहीत, मात्र मिळालेले धन कसे जपायचे, कसे योग्य वापरायचे याचे ज्ञान देतात. त्यांच्या विचारांमधून जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

# पैठण शहरात बारा हनुमान मंदिरांचा अभिषेक; भक्तीमय वातावरणात हनुमान जयंती उत्साहात साजरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण नगरीत चैत्र पौर्णिमेच्या शुभ पर्वावर बुधवारी हनुमान जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागांतील बारा हनुमान मंदिरांमध्ये अभिषेक, पूजन व जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.

नागघाट, रंगारहट्टी घाट, रेणुका देवी गल्ली, बालाजी मंदिर गल्ली, मामा चौक, शिव दिननाथ मठ, नाथ गल्ली, सुतारपार गल्ली, कुंभारवाडा, साळीवाडा,



धनगरवाडा, परदेशीपुरा, कहारवाडा, बाहेरील नाथ समाधी मंदिर परिसर, नारळा गल्ली, शिवनगर, इंदिरानगर, नवीन कवासन आणि लक्ष्मी नगर आदी भागांतील हनुमान मंदिरांत पहाटेपासूनच भक्तांची मोठी गर्दी उसळली होती.

भक्तांनी गोदावरीत स्नान करून पवित्र जल घेऊन मंदिरात जाऊन मंत्रोच्चारात अभिषेक केला. जल व पुष्पांची उधळण करत ''मारुतीराय की जय''च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. रंगारहट्टी येथील संकट विमोचन मारुतीची भव्य मिरवणूकही काढण्यात आली. शहरात सुमारे १५ हनुमान मंदिरे असून सर्वत्र अभिषेक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक संस्थांकडून भक्तांना फळांचे वाटप करण्यात आले.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची यशस्वी रौप्य महोत्सवी वाटचाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे दि. २ एप्रिल २०२६ रोजी रौप्य महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. २५ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करताना संस्थेने शिस्तबद्ध कारभार करत स्वमालकीची भव्य इमारत साकारली तसेच सभासदांना दरवर्षी १५ टक्के लाभांश व ऑडीट ''अ'' वर्ग मिळवण्याची परंपरा कायम राखली आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त लवकरच मोठा कार्यक्रम घेऊन सभासदांना संस्थामार्फत भेट देण्याचा मानस असल्याचे संस्थेचे चेअरमन अभय पितळे व व्हाईस चेअरमन शैलेश गांधी यांनी सांगितले.

सहकारी बँकिंग क्षेत्रात अतुलनीय योगदान देणाऱ्या सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी २५ वर्षांपूर्वी अतिशय दूरदृष्टीने जैन ओसवाल पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. सर्वसामान्य व्यावसायिकांसाठी आर्थिक पत निर्माण करून त्यांना पाठबळ देण्यात पतसंस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. स्व. सुवालालजी गुंदेचा यांनी सुरूवातीपासूनच शिस्तबद्ध कारभार करण्यावर भर दिला.



त्यामुळे संस्थेने स्पर्धेच्या युगातही अतिशय चांगली वाटचाल करीत मोठी प्रगती केली. सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात संस्थेकडे ९६ कोटी ३० लाख रूपयांच्या ठेवी असून कर्ज वाटप ७५ कोटी १० लाख रुपये आहे. एकूण कर्जापैकी सोने तारण कर्ज ४८ कोटी २५ लाख रुपये आहे. इतर बँकेतील ठेवी २८ कोटी २४ लाख रूपये आहेत. सीडी रेशो ७५.२८ टक्के आहे. भक्कम आर्थिक पायांवर पतसंस्थेची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

पतसंस्थेने स्थापनेपासून सभासदांना १५ टक्के लाभांश दिला आहे. ऑडिट अ वर्ग कायम राखला आहे. सुरूवातीपासून कायम नफा मिळवण्याची कामगिरी पतसंस्थेने केली आहे. पतसंस्थेत सोने तारण, नजर गहाण, वेअर हाऊस कर्ज सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय सोने खरेदीसाठी कर्ज ही अभिनव कर्ज योजनाही राबवली जाते. कर्ज वसुलीसाठी सर्व संचालक मंडळ नेटाने प्रयत्न करते. परिणामी संस्थेची आर्थिक स्थिती अतिशय चांगली राहिली आहे.

ठेवींवरही आकर्षक व्याजदर देण्यात येतो. पतसंस्थेची शहराच्या मध्यवर्ती भागात स्वमालकीची प्रशस्त व दिमाखदार इमारत आहे. याठिकाणी अद्ययावत लॉकर सुविधा उपलब्ध आहे. सर्व सरकारी कर भरणा सुविधाही अत्यल्प कमिशन आकारून दिली जाते. संस्थेचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत असून आधुनिक डिजिटल बँकिग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संस्थेच्या मार्केट यार्ड शाखेतूनही व्यापारी वर्गाला जलद बँकिग सुविधा दिल्या जातात. व्यवसाय करतानाच पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम सातत्याने राबविले आहेत. सभासदांसाठी आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यासाठी विशेष शिबिर नुकतेच घेण्यात आले. रौप्य महोत्सवी वाटचालीत सभासदांचा विश्वास आणि पाठबळ मोलाचे ठरले आहे.

# प्रत्येकाने सेवाभाव जपत गरजूंना आधार द्यावा– शारदाबाई अशोक कोठारी

## जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने गरजू कुटुंबांना किराणा वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ऐतिहासिक नगर शहराला संत विचारांची परंपरा आहे. त्यामुळे या मातीत सेवाभाव आहे. जैन वात्सल्य संस्था अनेक वर्षांपासून हाच सेवाभाव जपत समाजातील गरजूंना आधार देण्याचे काम करत आहे. परोपकार केल्याने मनाला आनंद मिळतो तसेच समाजासाठी कायम योगदान देण्याची प्रेरणा मिळते असे प्रतिपादन श्रीमती शारदाबाई अशोक कोठारी यांनी केले.

जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा, अन्नधान्य वितरण केले जाते. या महिन्यात स्व. अशोकलाल फुलचंद कोठारी यांचे स्मरणार्थ कोठारी परिवाराने या सामाजिक उपक्रमांसाठी सहकार्य केले. धार्मिक परीक्षा बोर्ड समोर स्व. अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर किराणा वितरण झाले. किराणा वाटप शारदाबाई अशोक कोठारी व कोठारी परिवाराच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोनाली राहुल गुंदेचा , सौ. पुनम निखील गुंदेचा , स्नेहल सचिन कोठारी , खुशी , सम्यक कोठारी, राष्ट्रीय जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय मार्गदर्शक अशोक (बाबूशेठ) बोरा, संस्थेचे सेक्रेटरी विजय गुगळे, व्यापारी महासंघाचे ईश्वर बोरा, मूलचंद डागा, सचिन चोपडा आदी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी सौरभ बोरा, प्रमिलाताई बोरा, चंपालाल विजय मुथा (वर्धमान), अशोक (बाबूशेठ) गौतम बोरा (एस.के. ज्वेलर्स), चंद्रकांत आशिषकुमार मुथा (वांबोरीवाला, इंडिया केम), तप आराधिका सोनल पारस चोरडिया (एन. सुमतीलाल), संतोष राजेश भंडारी ( महावीर कन्स्ट्रक्शन, टाकळी ढोकेश्वरवाला), सुनील शांतीलाल मुनोत (नेवासकर), अशोक अभय गांधी (रामलाल लालचंद), अजित विजय बोरा(पिंपळगाव माळवीवाला), संतोष पनालाल बोगावत (सतिश शरद), अजय अतुल बोरा (व्हीआरबी ज्वेलर्स), ॲड. विकी दिलिप मुथा, सतिष विक्रम मुथा (मुथा कलेक्शन), किशोर कुणाल गुगळे (किर्ती कलेक्शन) आदींचे योगदान लाभले.

अशोक (बाबूशेठ) बोरा म्हणाले की, जैन वात्सल्य संस्था नावाप्रमाणेच समाजातील गरजूंसाठी वात्सल्य भावनेनं अखंड सेवा कार्य करत आहे. वंचितांच्या चेहऱ्यावर फुलणारे हास्य लाठमोलचे आहे. आपल्या संस्कृतीने कायम गरजूंची मदत करण्याची शिकवण दिली आहे. स्व. अशोक कोठारी यांनी नेहमीच दानशूरपणे संस्थेच्या कार्यात हातभार लावला आहे. तीच परंपरा कोठारी परिवार पुढे चालवत आहे. शेवटी विजय गुगळे यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत नगरच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

## ८ नेमबाजांची सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. अहिल्यानगर सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या तब्बल ८ खेळाडूंनी उत्कृष्ट नेमबाजी करत सब नॅशनल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

या स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात मुग्धा राजापुरे, किर्ती चक्रवर्ती, कार्तिकी कोकाटे, प्रिशा मुनोत आणि राजलक्ष्मी घडेकर यांनी अचूक निशाण साधत यश मिळवले. तर १० मीटर एअर पिस्तोल प्रकारात रेवा शिंदे, अश्विनी महानूर आणि स्वाती काळे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला.

या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच खेळाडूंना हे यश मिळवता आले आहे. या यशाबद्दल खेळाडूंवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रज्ञाशोध परीक्षेत जय बजरंग प्राथमिक विद्यालयाचे यश

## जिल्हा गुणवत्ता यादीत विद्यार्थी चमकले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** डॉ. हेडगेवार प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परीक्षेत आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानाचे स्थान पटकावत उज्वल कामगिरी केली आहे.

या स्पर्धात्मक परीक्षेत इयत्ता चौथीतील चि. दर्शन गणेश घुले याने जिल्ह्यात १६ वा क्रमांक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले. तसेच इयत्ता पाचवीतील कु. श्रीलेखा गणेश आडसरे हिने १७ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. इयत्ता सातवीतील चि. अभिषेक प्रभाशंकर कुशवाह याने जिल्ह्यात १३ वा क्रमांक मिळवला, तर चि. सिद्धेश अमोल क्षीरसागर याने १५ वा क्रमांक पटकावून विद्यालयाच्या यशात भर घातली.

या यशाबद्दल आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्रजी फिरोदिया, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर आणि सहव्यवस्थापक अमोल तोडकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरित केले. या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचा मोठा वाटा असून, कल्पना मिसाळ, छाया क्षीरसागर, राहुल मोरे, अश्विनी बेरड आणि भागवत पाखरे यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.

# लक्ष्मीकारंजा येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात संपन्न; असंख्य भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील लक्ष्मीकारंजा परिसरातील श्री संकटमोचन मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव २०२६ मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपन्न झाला. पहाटे ५:४० वाजता पार पडलेल्या श्री मारुती जन्मोत्सव सोहळ्याने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. दिवसभर भाविकांना टरबूज व खरबूजाचे वाटप करण्यात आले.

यंदाच्या उत्सवातील विशेष आकर्षण ठरलेला महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रम अत्यंत भक्तिभावाने पार पडला. सकाळी ११:३० वाजता महाआरतीनंतर




महाप्रसादाचे वितरण सुरू झाले. या वेळी असंख्य भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला. यंदा महाप्रसादामध्ये सार-भात व लापशीचा समावेश करण्यात आला होता. सुयोग्य नियोजनामुळे भाविकांना कोणतीही अडचण न होता महाप्रसादाचा लाभ घेता आला. मंदिर परिसरात दिवसभर भक्तांची मोठी वर्दळ पाहायला मिळाली.

उत्सवानिमित्त हनुमान चालीसा पठण व भजन संस्थेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते व सामूहिक पठण आणि भजनातून भक्तिरसाचा अनुभव घेतला.

उत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अष्टविनायक ब्लड बँक सेंटरच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात ६५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

धार्मिकतेसोबत समाजसेवेचा संदेश देणारा हा उत्सव भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वी ठरला.

# नालेगावात हनुमान जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक; टाळ–मृदंगाच्या गजरात परिसर दुमदुमला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण परिसरात हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळ व श्री पावन हनुमान व्यायामशाळा यांच्या वतीने भव्य पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. टाळ–मृदंगाच्या गजरात, श्री हनुमानाचा विजय असो अशा जयघोषांनी संपूर्ण नालेगाव परिसर अक्षरशः दुमदुमून गेला.

या पालखी मिरवणुकीत भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. गवळणी व अभंगांच्या तालावर फुगडीचे रिंगण रंगले आणि पारंपरिक वारकरी संस्कृतीचा सुंदर आविष्कार पाहायला मिळाला. रस्त्यांवर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती तसेच फुलांच्या सजावटीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

या सोहळ्यात गायक राजू भोईटे, प्रकाश झाडे, नामदेव तुळशे, राधाकिसन झाडे यांच्या मधुर आवाजाने भक्तिगीतांची मैफल रंगली. पखवाज वादनात आदिनाथ ढोले यांनी आपल्या कलेचा उत्कृष्ट आविष्कार सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण वातावरणात भक्ती, श्रद्धा आणि उत्साह यांचे सुंदर मिश्रण अनुभवायला मिळाले.

यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रेय मुदगल म्हणाले की, नालेगाव गाडगीळ पटांगण येथील श्री पावन हनुमान मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे दरवर्षी हनुमान जयंतीनिमित्त सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गेल्या ३४ वर्षांची ही परंपरा अखंडपणे सुरू असून या माध्यमातून वारकरी संप्रदायाला चालना मिळत आहे.

वारकरी संप्रदाय हा युवा पिढीला प्रेरणा, ऊर्जा आणि संस्कार देणारा असून अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात एकोपा व भक्तीभाव वाढीस लागतो. हनुमान जयंतीनिमित्त आयोजित पालखी मिरवणुकीत दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते, असे त्यांनी सांगितले.

# शिर्डीत घुमला जय श्रीरामचा नारा; सव्वाशे किलोचा बजरंग गोटा उचलत तरुणांनी दाखवले शौर्य!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डीच्या पवित्र भूमीत आज भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. हनुमान जयंतीच्या शुभमुहूर्तावर शिर्डीतील तरुणाईने सव्वाशे किलो वजनाचा दगडी बजरंग गोटा उचलून आपल्या शारीरिक क्षमतेचे आणि मारुतीरायावरील श्रद्धेचे दर्शन घडवले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून साईच्या नगरीत श्री साईबाबा संस्थान चे माजी विश्वस्त सचिन तांबे यांच्या नेतृत्वाखाली क्रांती युवक मंडळाच्या माध्यमातून शिर्डीतील तरुणाई निर्व्यसनी व सुदृढ व्हावी यासाठी विविध उपक्रम राबविले जातात आज हनुमान जयंतीच्या निमित्ताने शिर्डीतील दक्षिणमुखी हनुमान मंदिरासमोर अनेक वर्षांची परंपरा असलेली तब्बल सव्वाशे वजनी दगडी बजरंग गोटा उचलण्याची स्पर्धा संपन्न झाली.या स्पर्धेत जवळपास



५० तरुणांनी सहभाग नोंदविला यातील तीस पेक्षा जास्त तरुणांनी अतिशय गुळगुळीत असलेला बजरंग गोटा शक्ती आणि युक्तीचा वापर करत चक्क खांद्यावर उचलून मारुतीराया च्या नामाचा गजर करत मागील बाजूस टाकला.

सकाळी नऊ वाजता दक्षिणमुखी हनुमान मंदिरासमोर शिर्डी नगरपरिषदेचे नगरसेवक सतीश उर्फ नंदू भाऊ गोंदकर,पालखी स्वागत समितीचे अध्यक्ष बाळासाहेब गोंदकर,नगरसेवक बापू ठाकरे,वसंत गोंदकर, अतुल गोंदकर, डॉ प्रशांत गोंदकर,नवनाथ गोंदकर, दत्तात्रय सोमवंशी, काका आहेर व ग्रामस्थ आणि साईभक्तांच्या उपस्थितीत बजरंग गोट्याचे अभिषेक व पूजन करत नारळ फोडून स्पर्धेला प्रारंभ करण्यात आला

शिर्डीतील व्यायाम पटू तरुण व उपजतच सुदृढ असलेले तरुण या स्पर्धेत दरवर्षी न चुकता सहभागी होत असतात मात्र १२५ किलो वजनी आणि गुळगुळीत असलेल्या हा दगडी बजरंग गोटा उचलण्यासाठी शक्ती बरोबर युक्तीचा देखील वापर करावा लागतो तेव्हाच हा गोटा उचलण्यात यश येते आज तीस च्या वर तरुणांनी यशस्वीपणे गोटा उचलत आपल्या शक्ती आणि भक्तीचे प्रदर्शन उपस्थितांना घडविले अनेकजण हा गोटा उचलण्यात असमर्थ ठरले मात्र ज्यांनी उचलला त्यांनी जय श्रीरामाचा जयघोष करत मारुतीरायाला वंदन केले.यानंतर क्रांती युवक मंडळ व शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने विजेत्यांचा हनुमानाची प्रतिमा शाल व प्रमाणपत्र देत गौरव करण्यात आला.

# महेश मनोत विद्यालयात भगवान महावीर जयंती साजरी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तालुक्यातील वांबोरी येथील अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या महेश मुनोत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रशालेचे शाला समितीचे चेअरमन हेमंत मुथा उपस्थित होते. तीर्थंकर भगवान महावीरांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक बी. एम. पटारे यांनी केले .

प्रशालेच्या विद्यार्थ्यांसाठी खास परमपू महाराज यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी परमपूज्य नियमदर्शनाजी महाराज म्हणाल्या की, भगवान महावीर यांचे जीवनकार्य अत्यंत व्यापक, आदर्श व त्यागाचे होते. भारतीय व जैन संस्कृतीचे ते आद्य प्रवर्तक होते. दया, क्षमा, शांती, अहिंसा व त्याग ही पंचकर्मे म्हणजे भगवान महावीरांनी भारतीयांना दिलेली प्रमुख आयुधे होती. विद्यार्थ्यांनी मी सदैव सर्वोत्तम करेल, मी उदात्त ध्येय ठेवून यशापर्यंत पोहोचेल अशी भावना बाळगावी. उद्याच्या विद्यार्थ्यांच्या यशात आजची मेहनत व परिश्रम म्हणूनच महत्त्वाचे ठरतात. विद्यार्थ्यांनी गरजेपुरताच मोबाईलचा वापर करावा, ध्येय गाठण्यासाठी भगवान महावीरांनी सांगितलेल्या विचारांनी जीवन पादाक्रांत करावे असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

(पान १ वरून)

## गॅस दरवाढीवर प्रशासनाची तातडीची कारवाई

राहील. दरम्यान, संघटनेच्या वतीने शहरातील एचपी व इंडियन ऑइलचे बंद असलेले गॅस पंप तातडीने सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.
या बैठकीस शहर पुरवठा तहसीलदार सपना बहुते, संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश तात्या घुले, उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, लतीफ शेख, गणेश आटोळे, नारीस खान, सुधाकर साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षा चालक उपस्थित होते.गॅस दरवाढीवर प्रशासनाची तातडीची कारवाई.

## ‘मार्चएण्डला’ जिल्ह्यात अवैध दारूविक्रेत्यांवर छापे

त्यानुसार ही मोहीम राबविण्यात आली. या पथकांमध्ये सहायक पोलीस निरीक्षक हरीश भोये, उपनिरीक्षक महादेव गुट्टे तसेच पोलीस अंमलदारांचा समावेश होता.

## शहरात मुलींच्या हॉस्टेलसाठी जागा देणार – महापौर ज्योती गाडे

सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, विजय पठारे, अतुल कोताडे, बाजीराव अनभुले, शिवाजी लवांडे, छबू फुंदे, साहेबराव रक्टे, आप्पासाहेब जगताप, ईश्वर धुमाळ, संभाजी गाडे, बाळाजी गायकवाड, सुधीर कानवडे, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ, सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह प्रा. सुनिल पंडित, भाऊसाहेब रोहोकले, विलास साठे, नंदकुमार शितोळे, शिरीष टेकाडे, सुभाष कडलग, मारुती लांडगे, उत्तम राजळे, अमोल ठाणगे, अमोद नलगे, राहुल झावरे, सुभाष भागवत, गुलाब गाडेकर, सत्यवान थोरे आदींसह सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.
प्रास्ताविकात बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले की, २५ वर्षांनंतर सोसायटीत सत्तांतर झाले असून नवीन संचालक मंडळाचा हा पहिला कृतज्ञता सोहळा आहे. संस्थेची ‘अ’ वर्ग ऑडिट श्रेणी, १०,७८४ सभासद आणि ९७५ कोटी रुपयांचे कर्जवाटप झालेले आहे. संस्थेचा विकास व सभासद हितासाठी सर्व संचालक योगदान देत आहे. जिल्हा बँकेत २५० कोटींची सीसी मंजूर असून ती १०० कोटींवर आणली आहे.
निवडणुकीपूर्वी दिलेल्या शब्दाप्रमाणे साडे सहा हजार रुपयांचा थकित कृतज्ञता निधी सेवानिवृत्त सभासदांना देण्यात येत आहे. तसेच सभासदांच्या मुलांसाठी मोफत अभ्यासिका सुरू करून यूपीएससी व एमपीएससीसाठी तज्ञ मार्गदर्शन देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पारदर्शक व काटकसरी कारभारातून राज्यात आदर्श सोसायटी उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.
चेअरमन आप्पासाहेब शिंदे यांनी सांगितले की, सत्तेत आल्यानंतर ट्रॉफी, कॅलेंडर, मंगल कार्यालय आदी खर्चात लाखो रुपयांची बचत करण्यात आली. २५ वर्षांनंतर सत्तांतर घडवून आणत सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, तसेच कोणतीही योजना बंद केली जाणार नाही. शहीद जवानाच्या वारसाला १ लाख रुपयांची मदत, दिवंगत सभासदांची कर्जमाफी व ठेवी परत देणे, पाल्यांच्या लग्नासाठी १५ हजार रुपये देणे असे उपक्रम राबविले जात आहेत. मुख्य शाखेत एमपीएससी मार्गदर्शन केंद्र आणि जूनपासून प्रत्येक शाखेत अभ्यासिका सुरू करण्याचा मानस आहे. महापालिकेकडून भूखंड मिळाल्यास मुलींसाठी हॉस्टेल व शिक्षक भवन उभारण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.
उपमहापौर धनंजय जाधव यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत मुलींच्या हॉस्टेलसाठी भूखंड देण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. सुनील पंडित यांनी संचालक मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. गुणवंत विद्यार्थिनी वैष्णवी व्यवहारे व वेदिका शेळके यांनी या सन्मानामुळे प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. सुभाष कडलग यांनी सोसायटीचा परिपूर्ण कारभार कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. तसेच सोसायटी स्वयंपूर्ण व्हावी व ठेव सुरक्षित राहावी यासाठी सभासदांनी ठेवी येथेच ठेवाव्यात, असे आवाहन केले.
माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी पारदर्शक कारभार कायम ठेवण्याचे आवाहन केले.
सेवानिवृत्त सभासद उत्तम राजळे व सखाराम गारुडकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरीशचंद्र दळवी यांनी केले तर आभार सुरज घाटविसावे यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.